## प्रकरण तिसरे

## अण्णाभाऊ साठे यांच्या लोकनाटयातील आशयाचे स्वरूप

### प्रस्तावना :

शाहीर अण्णाभाऊ साठे कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते होते. समाजामध्ये सुधारणा व्हावी, श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी नाहीशी व्हावी, सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचार संपुष्टात यावा आणि एक नवा शोषणमुक्त समाज अस्तित्वात यावा ही त्यांची तळमळ होती. त्यामुळे त्यांनी आपल्या लोकनाटयातून वरील विचार सांगितला आहे. हा विचार समाजातील तळागाळापर्यंत पोहचावा. म्हणून गेल्या तीन साडेतीनशे वर्षांपासून खेडयापाडयात लोकप्रिय असणा-या आणि सामान्यांची रंजनाची भूक भागविणा-या तमाशातून काही वैशिष्टये स्वीकारुन त्यांनी आपली लोकनाटये लिहिली. या लोकनाटयातून वरील आशयसूत्राला अनुसरून कथानकाची बांधणी केली. पारंपरिक तमाशाच्या रूपामध्ये कालानुरूप बदल केला. तमाशातील कालबाहय झालेले घटक वगळून त्यांनी आपल्या लोकनाटयाची निर्मिती केली. आपल्या विचाराशी सुसंगत ठरेल. अशाप्रकारचा बदल करून नव्या लोकनाटयाची निर्मिती केली. नाटक आणि लोकनाटय यात काही मूलभूत फरक असतो विमुक्तपणा हे लोकनाटयाचे वैशिष्टय असते.

प्रस्तुत प्रकरणामध्ये अण्णाभाऊंनी जी लोकनाटये लिहिली आहेत. त्यातील कथानकाची वैशिष्टये कोणत्या प्रकारची आहेत. अण्णाभाऊ साठे यांना अभिप्रेत असणारा विचार या लोकनाटयातून कसा व्यक्त झालेला आहे. इत्यादी गोष्टींचा अभ्यास प्रामुख्याने येथे अभिप्रेत आहे.

अ. अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील आशयसूत्रे :

अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील आशयात केवळ कालानुक्रमाने प्रसंगाचे कथन केलेले नसून त्यामधील कार्यकारणभावाचा दुवा स्पष्ट केलेला दिसतो. त्यांच्या लोकनाटयातील संभाव्यता, कार्यकारण मिमांसा व कुतूहलनिर्मिती यामुळे निर्माण झालेली लोकनाटये ही सामाजिक आशयाचे चित्रण करणारी आहेत.

अण्णाभाऊंनी आपल्या लोकनाटयामधून लोकांच्या मनावर ठसा उमटविण्यासाठी सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनातील व्यावहारिक प्रसंग घेऊन ते लोकनाटयामध्ये सजविले आहेत. केवळ काल्पनिक उदाहरणे देऊन लोकांचे रंजन केलेले नाही तर वास्तव जीवनाचे चित्रण त्यांच्या लोकनाटयात पहावयास मिळते.

स्वातंत्र्योत्तर काळातील सार्वत्रिक निवडणुकांतील विविध अनुभव, मतदानातील घोटाळे, राजकीय नेतेमंडळींचा आपमतलबीपणा, निवडून येण्यासाठी जीवाचा आटापिटा करून कोणत्याही थराला जाण्याची राजकारण्यांची बेछूट वृत्ती आणि या सर्व संग्रामात सर्वसामान्य जनतेची होणारी ससेहोलपट, गरीब आणि श्रीमंत यामधील रुंदावत जाणारी दरी असे अनेकविध विषय अण्णाभाऊंनी आपल्या लोकनाटयामध्ये आणलेले दिसतात. अण्णाभाऊनी आपल्या लोकनाटयामधून प्रबोधनाबरोबरच प्रगत जीवनांकडे नेणारी नवी विचारप्रणाली, तत्कालीन जीवनदर्शन, लोकसमजुती, रूढी, परंपरा तसेच भोंदूगिरी दारिद्रय आणि राजकारण्यांचा भ्रष्ट स्वभाव यांचाह

विचार आपल्या लोकनाटयातून केला आहे. जगण्यासाठी अहोरात्र कष्ट करणा-या सामान्य माणसांची व्यथा, त्यांचे विचार, आणि जीवन जगण्याची पध्दत यांना केंद्रस्थानी ठेवूनच त्यांनी आपली लोकनाटये अविष्कृत केलेली दिसतात.

अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील विषय आणि आशयाची रूपे ही वेगवेगळया त-हेची आहेत. शेतमजूर त्यांचा भोळेपणा, कामगारांची अवस्था, शेठजी-भटजी यांची शोषक वृत्ती अशी कित्येक आशयसूत्रे घेऊन अण्णाभाऊंनी आपली लोकनाटये लोकप्रिय बनविली.

अण्णाभाऊंच्या नावांवर आज चौदा लोकनाटये आढळतात. त्यापैकी बारा उपलब्ध असून एक " निवडणुकीत घोटाळे " हे अनुपलब्ध तर " राजा संग्रामसिंह " हे अण्णाभाऊंच्या नावांवर असले तरी ते शाहीर द. ना. गव्हाणकर यांच्या नावांवर आढळते. त्या-दृष्टीने अण्णाभाऊंच्या लोकनाटयाचे स्वरूप पुढीलप्रकारचे आहे.

१. अकलेची गोष्ट :

हे अण्णाभाऊंचे पहिलेच लोकनाटय होय. १९४६ मध्ये त्याचा पहिला प्रयोग झाला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या पूर्वकाळात ते लिहिल्यामुळे विषयात वेगळेपणा दिसतो. अण्णाभाऊ हे मार्क्सवादी विचाराचे पुरस्कर्ते आहेत. मार्क्सवादी तत्वज्ञानाने भारावून गेल्यामुळे श्रमजीवी, अर्धपोटी, अवस्थेत संसाराचा गाडा ओढणा-या कामगाराला मार्क्सचे तत्वज्ञान या लोकनाटयातून पटवून सांगितले आहे.

या लोकनाटयातील " जानबा" हा नायक असून तो किसान सभेचा कार्यकर्ता आहे. तसेच " बंडू " हा दुधाचा व्यापारी व " गुंडू " हा सावकार आहे. या तिघांनी एकमेकांना अकलेची गोष्ट सांगायची. जो दुस-याची गोष्ट खोटी म्हणेल त्याने दंड भरायचा. असे ठरते. पहिल्यांदा " बंडू " व त्यानंतर " गुंडू " शाहिरीमधून आपल्या पूर्वजांची थोरवी

सांगतात. त्यानंतर किसानसभेचा कार्यकर्ता " जानबा" हा आपल्या आजोबाची गोष्ट सांगतो व गोष्टीच्या अखेरीस " बंडू " व " गुंडू" यांचे आजोबा खोटेपणा करुन गरीबांना लुबाडतात. त्याना फसवून आपण ऐषआरामात राहतात. तेव्हा जानबा म्हणतो. आमच्या आजोबानी त्याना एक लाख खंडी धान्य व कडबा उधार दिला त्याचे पैसे त्यानी अजून दिले नाहीत. हे ऐकून बंडू व गुंडू चूप होतात. जर गोष्ट खोटी म्हटली तरदंड भरावा लागणार. खरी म्हटली तर पैसे परत करावे लागणार. असा मोठा प्रश्न त्याना पडतो. आणि जानबाच्या या हुषारीमुळे प्रेक्षक खुष होतात.

२. शेटजीचे इलेक्शन :

प्रस्तुत लोकनाटय अण्णाभाऊंनी कम्युनिस्ट पार्टीच्या प्रसारासाठी लिहिलेले असावे. ते १९४६ मधील आहे. कॉंग्रेस हा श्रीमंत, भांडवलशाही-वादी पक्ष व कम्युनिस्ट हा गरीब किसान कामगारांचा, नाडलेल्या लोकांचा पक्ष असे कल्पून या दोन्ही पक्षांच्या ध्येयधोरणांतील आणि दृष्टिकोणातील स्पष्टता दाखविण्याच्या दृष्टिकोणातूनच प्रस्तुत लोक-नाटयाची निर्मिती झालेली दिसते.

रहिमतपूर येथील " मगरचंद" हा भांडवलदार, व्यापारी आहे. तो निवडणुकीला उभे राहतो. निवडून येण्यासाठी अनेक आश्वासने देतो, पण ही आश्वासने ऐकून जनता खुष होत नाही. उलट " मगरचंद"ला अनेक प्रश्न विचारुन भांबावून सोडतात. म्हणजेच मगरचंदाच्या प्रतिगामी पुढारीपणाची वृत्ती दाखविणे हे या लोकनाट्याचे कथासूत्र आहे.

३. माझी मुंबई :

प्रस्तुत लोकनाटय हे १९४९ मध्ये लिहिलेले आहे. या लोकनाटयामध्ये भांडवलदार वर्ग आणि मराठी कामगार यांच्यातील संघर्ष मराठी जनतेच्या अंत:करणापर्यंत भिडविलेला दिसतो. या लोकनाटयातील साध्या,

सोप्या, तरीही अलंकृत भाषेतील काव्य समर्थपणे मराठी माणसाला लढयाच्या हाकेची साथ घालू पहाणारे आहे. हा लढा म्हणजे संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा आहे.

प्रस्तुत लोकनाटयामध्ये " विष्णू " हा मराठमोळा कामगार " मुनीमजी " या गुजराथवादी बनियाच्या बरोबर " मुंबई कोणाची" या प्रश्नावर वाद घालतो. मुंबई शहर महाराष्ट्राला न जोडता स्वतंत्र ठेवावे. असे मुनिमजी प्रतिपादन करतो. पण मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी " विष्णू" करतो. या मुद्यावरील झगडा अतिशय प्रभावीपणे प्रस्तुत लोकनाटयामधून साकार केला आहे.

४. बिलंदर बुडवे :

या लोकनाटयामध्ये अण्णाभाऊ स्पष्ट करतात, की माणसाने घेतलेले कर्ज बुडवू नये. समाजामध्ये ठकास महाठक असतात. म्हणजेच शेरास सव्वाशेर भेटला की माणूस योग्य त्या वळणावर येतो. ही शिकवण अधिक प्रत्ययकारीपणे प्रस्तुत लोकनाटयातून आविष्कृत केलेली दिसते.

यामध्ये एक अडाणी गावरान माणूस " बाबुराव बाजी बुडवे" हा नावाप्रमाणे बुडवेगिरी करणारा आहे. याने मलकापूरच्या पाटलाचे वीस रुपये कर्ज घेतलेले असते. पण " राणोजी" मात्र एक हजाररुपयांचा कागद करुन घेतो. व कर्ज कसेही कोणत्याही परिस्थितीत वसूल करण्याचे आवाहन " राणोजी " स्वीकारतो. एक वर्षाची मुदत या कर्जासाठी दिलेली असते. एक वर्षानंतर कर्ज वसूलीसाठी राणोजी येतो. बुडवे नेहमीप्रमाणे बुडवेगिरीची बोलणी बोलू लागतो. शेवटी " राणोजी" बुडव्याचा बाप मरणाला टेकलेला म्हातारा कर्जाच्या मोबदल्यात कर्ज फिटूपर्यंत आपल्याकडे नेतो. पण बुडवे अट घालतो की म्हातारा मेला तर एक लाख रुपये दंड दावा लागेल. राणोजी हे मान्य करतो. काही दिवसानंतर म्हातारा..............

मेला. असे बुडव्याला समजते. बुडवे एक लाख रुपये आता आपल्याला मिळणार या लालसेने इतर लोकांच्याकडील पुन: एक हजार रुपयाचे कर्ज काढतो. आणि राणोजीची कर्जफेड करतो. व आमचा म्हातारा आम्हाला परत करा. असे सांगतो. तेव्हा शेरास सव्वाशेर असणारा राणोजी लपवून ठेवलेल्या म्हाता-याला बुडव्याच्या स्वाधीन करतो. व आपल्या कर्जाची परतफेड अशापध्दतीने करतो.

५. पुढारी मिळाला.

या लोकनाटयामध्ये पुढारी होण्यासाठी नेते लोकांची होणारी ससेहोलपट अतिशय विनोदी रुपात अण्णाभाऊंनी अविष्कृत केलेली आहे. या लोकनाटयामध्ये " वाघेरी " नावाचं एक खेडं आहे. त्या गावचा " पाटील " तसेच पुढारी होण्याचा मोठा अट्टाहास धरलेला " डोई-फोडे साहेब" " सत्तू " " पुतळा" " पडवळ" " जांभुळवाडीचा नारायण मास्तर" अशी वेगवेगळया त-हेची पात्रे आलेली दिसतात.

" डोईफोडे साहेब" याला एकदा निवडून दिलं आहे. निवडून गेल्यानंतर याने कोणत्याही सुधारणा केलेल्या नाहीत. नावांप्रमाणेच तो सामान्य जनतेची डोकी फोडणारा आहे. ज्यावेळी पुन्हा निवडणुका येतात. त्यावेळी डोईफोडेसाहेब मला निवडून द्यावं. अशी वीनवणी पाटील आणि इतर सर्व गावकरी मंडळीना करतो. त्यासाठी एक सर्व गावक-यांची सभा आयोजीत केली जाते. आणि या सभेमध्ये पुढारी म्हणून कोणाला निवडून द्यावयाचे यासंबंधी नाटयपूर्ण घटना घडते. व किसान सभेचा कार्यकर्ता " सत्तू " यास पुढारी केला जाते.

६. पेंग्याचे लग्न :

अण्णाभाऊंनी एक सामाजिक विषय अतिशय विनोदी रुपात प्रस्तुत लोकनाटयातून आविष्कृत केलेला दिसतो. उत्तर कोकणामध्ये पेंग्याचं लग्न नेहमीप्रमाणे हुंडा न देता व जीवघेणे कर्ज, उसणावारी,

इत्यादीचा खर्च टाळून कसे लावले जाते. याचे विनोदी वर्णन प्रस्तुत लोकनाटयामध्ये करून खास कोकणवासी लोकांच्यासाठी या लोकनाटयाची निर्मिती केली असावी असे वाटते. सामान्य, गोरगरीब जनतेची रुढीप्रियता आणि त्यांच्या सुखदुःखाचा विचार याठिकाणी प्रकर्षाने केल्याचे जाणवते.

७. दुकाळात तेरावा :

प्रस्तुत लोकनाटय हे तमासगिरांच्या जीवनांवर आधारित आहे. मर्यादित मिळणा-या उत्पन्नामुळे जेमतेम कसेतरी दिवस पुढे ढकलत असताना दुसरा कोणी मनुष्य पाहुणा म्हणून आला तर कशी बिकट अवस्था होते. याचे उत्कृष्ट प्रत्यंतर अतिशय विनोदी रूपात अण्णा-भाऊंनी प्रस्तुत लोकनाटयातून साकार केलेले आहे.

यामध्ये तमासगिरांच्या कौटुंबिक परिस्थितीवर जसा प्रकाश टाकला आहे. त्याप्रमाणे ही माणसे जश्यास तसे वागून बेछूट वृत्तीच्या माणसां[illegible] योग्य धडा शिकविणारी आहेत हे दाखविले आहे.

८. बेकायदेशीर :

प्रस्तुत लोकनाटय हे राजकारण्यांच्या दांभिकपणावर आधारलेले दिसते. १९४७ च्या निवडणुकीनंतर जी परिस्थिती निर्माण झाली. यामध्ये निवडणुकीत निवडून येण्यासाठी जी वचने दिली आणि निवडून आल्यानंतर त्या वचनाशी भ्रष्ट झालेल्या राजकारण्यांवर प्रस्तुत लोकनाटया-तून प्रकाश टाकलेला दिसतो.

यामध्ये " मगरचंद" हा मंत्री आहे." रघुनाथमल " हा गिरणी-मालक आहे. तर " धोंडया" हा रघुनाथमलचा नोकर आहे. व " सत्तू " हा कामगार नेता आहे. पगारवाढ व्हावी या उद्देशाने अनेक विनंत्या करून पगारवाढ होत नाही म्हणून शेवटी संप केला जातो. पण आपले वर्गीय हितसंबंध सांभाळण्यासाठी मंत्री " मगरचंद" हे " रघुनाथमल" या

मिलमालकाच्या मिलमधील कामगारांचा संघ बेकायदेशीर ठरवितात. व कामगारांच्या मागण्या, हक्क डावलू पहातात. पण शेवटी सर्व कामगारांच्या एकजुटीमुळे मीलमालक रघुनाथमल आणि मंत्रीमगरचंद दोघेही घाबरतात. व कामगारांच्या सर्व मागण्या मान्य करण्याखेरीज पर्यायच रहात नाही. कामगार राज्याचे अण्णाभाऊंचे स्वप्न प्रस्तुत लोकनाटयात दाखविले आहे.

९. मूक मिरवणूक :

१९४९ मधील हे लोकनाटय आहे. समाजवादी आणि कम्युनिस्ट पक्ष यांच्या कार्यपध्दतीतील फरक दर्शविण्यासाठी हे लोकनाटय लिहिलेले दिसते.

या लोकनाटयामध्ये मुंबईतील चाळीत रहाणारे कामगार बेघर होणार या भावनेमुळे कामगारांची दुरावस्था होते. त्यासाठी समाजवादी पक्षाचे कार्य करणाऱ्या " उपासे सारख्या नेत्याच्या नेतृत्वाखाली सरकारला जाब विचारण्यासाठी मोर्चा काढला जातो. पण " उपासे " साहेबांच्या पलायनवादी वृत्तीमुळे मोर्चा अयशस्वी ठरतो. शेवटी त्या मोर्चाचे नेतृत्व कम्युनिस्ट पार्टीचा नेता " विष्णू " करतो. व मोर्चा यशस्वी केला जातो. याचा विचार प्रस्तुत लोकनाटयामधून आला आहे.

१०. लोकमंत्र्याचा दौरा :

१९५२ साली हे लोकनाटय निर्माण झाले आहे. कॉंग्रेसचे पहिले मंत्रीमंडळ सत्तेवर आल्यानंतर स्वार्थी आणि संधीसाधू राजकारण्यानी जनतेला दिलेली पोकळ आश्वासने तसेच सर्वसामान्य जनतेच्या वर्तमान जीवनाशी, वास्तवाशी थोडासुध्दा संपर्क न आल्यामुळे सुधारणावाचून वंचीत राहिलेल्या जनतेची झालेली बीकट अवस्था त्यांच्याशी मंत्र्यानी केलेली बेईमानी इत्यादी बाबींचे दर्शन या लोकनाटयामध्ये घडविले आहे.

या लोकनाटयामध्ये " मगरचंद" हा मंत्री आहे. मंत्र्याचा सहाय्यक म्हणून " मि. घोटाळे " काम करतात. मि. खटारिया हे गिरणी मालक आहेत. आणि या तिघांच्या विरोधात जाणारे वर्गजागृत " विष्णू " " हणमू " यांच्यारूपाने संबंध महाराष्ट्रातील गिरणी कामगारांची अवस्था चित्रीत केलेली दिसते.

११. खाप-या चोर :

प्रस्तुत लोकनाटय १९४६ मधील आहे. खेडयातील सावकार, जमीनदार हे कष्टकरी शेतक-यांचे शोषण करतात आणि शोषीत शेतकरी, कष्टकरी आपल्यावरील अन्यायाला तोंड देण्यासाठी, सामोरे जाण्यासाठी शेठ सावकाराना योग्य रीतीने अद्दल घडवितात. यासाठी अनेक युक्त्या वापरून शेट सावकारानी घेतलेल्या जमीनी पुन्हा सोडवून घेतात. याचे अतिशय विनोदी पध्दतीचे चित्रण प्रस्तुत लोकनाटयामध्ये घडविले आहे.

१२. देशभक्त घोटाळे :

हे १९४६ मध्ये निर्माण झालेले लोकनाटय आहे. मार्क्सवाद आणि आंबेडकरवादाचा सुंदर समन्वय या लोकनाटयामध्ये पहावयास मिळतो.

" घोटाळे " आडनावाच्या कॉंग्रेस पुढा-याच्या धर्तेवर हे लोकनाटय आधारले असून पुढा-याचा दांभिक, ढोंगी आणि आपमतलबी स्वभाव या लोकनाटयातून प्रकट होताना दिसतो. " घोटाळे " हा कॉंग्रेसचा उमेदवार याची फजिती होते आणि कम्युनिस्ट विजयी होतात. अशा आशयसुत्रानेयुक्त हे लोकनाटय सजले आहे.

१३. निवडणुकीत घोटाळे :

हे लोकनाटय १९४६ मधील आहे. पण आज उपलब्ध नाही. निवडणुकीतील राजकारण्यांच्या दांभिकपणावर कोरडे ओढण्यासाठी या लोकनाटयाची निर्मिती केलेली दिसते. " घोटाळे" नावाचा

काँग्रेस नेता निवडणुकीसाठी उभा राहतो. आणि मते मिळविण्यासाठी गबाळ्यासारखे मतदारांच्या मागे लागल्यामुळे तो हास्यास्पद कसा ठरतो. तसेच महात्मा गांधीच्या विचारातील तात्वीक भूमिका जनतेला सांगून आपण गांधीवादी कसे आहोत. हे सांगत असताना होणारे घोटाळे अतिशय विनोदी पध्दतीने अण्णाभाऊंनी प्रस्तुत लोकनाटयातून चितारलेले आहेत. काँग्रेस पक्ष व त्यांच्या ध्येयधोरणाला आणि कार्यपध्दतीला उघडे पाडणे या भूमिकेतूनच प्रस्तुत लोकनाटयाची निर्मिती झालेली दिसेत.

तसेच अण्णाभाऊंचे " जाऊ तिथे खाऊ " हे लोकनाटय आढळते. पण हे लोकनाटय आज उपलब्ध नाही. विनोदाच्या अंगाने या लोकनाटयाच विकास होत गेला आहे. लाच घेणारा मनुष्य कुठेही कसीही लाच खातो. याचे विनोदी वर्णन या लोकनाटयांमध्ये आढळते.

अण्णाभाऊंनी वरील आशयसूत्रांचा स्वीकार करुन लोकनाटयांची निर्मिती केली व मराठी मनाचे रंजन करुन प्रबोधनाचे महान कार्य केलेले दिसते. वरील सर्व लोकनाटये साधारणपणे १९४५ ते १९६९ च्या दरम्यान लिहिली. व मराठी साहित्यात लोकनाटयाचे नवे पर्व सुरु केले. अण्णाभाऊंनी आपली ही लोकनाटये शाहीर अमरशेख व शाहीर द. ना. गव्हाणकर यांच्या सहाय्याने लालबावटा कलापथकाद्वारे अतिदूर खेडयातील पिळवणूकीने गांजलेल्या शोतक-यापर्यंत नेऊन पोहोचविली व त्याना संघर्षाची जाणीव करुन दिली. त्यामुळेच अण्णाभाऊंची वरील सर्वच लोकनाटये ही समकालीन जीवनांसी समरस होऊन आविष्कृत झालेली दिसतात.

ब. अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील आशय :

अण्णाभाऊ साठे यांनी जी विविधप्रकारची लोकनाटये लिहिली. त्यांची आशयसूत्रे आपण आता पाहिली. या आशयसूत्राशी निगडीत असणारा आशय तो आपल्या लोकनाटयाच्या कथानकातून कसा प्रभावीपणे मांडतात. हे ध्यानात घेण्यासाठी त्यांच्या लोकनाटयांच्या कथानकाचे स्वरुप पाहू.

## १. ग्रामीण जीवनाचे चित्रण :

अण्णाभाऊंच्या लोकनाटयातील ग्रामीण जीवन हे वाटेगांव आणि वाटेगावच्या परिसरातील विविध वृत्तीप्रवृत्तीच्या लोकजीवनाचे चित्रण आहे. पण ते प्रातिनिधिकही आहे. तेथील लोकाच्या जीवन जगण्याच्या चाली, रिती, रिवाज, परंपरा आणि भाववेडी माणसे यांचे मनोज्ञ दर्शन घडते. त्याचबरोबर मराठमोळया माणसाच्या आचार-विचाराचे व भावभावनांचे उत्कृष्ट दर्शन त्यांच्या ग्रामीण लोकनाटयामधून पहावयास मिळते. त्यादृष्टीने त्यांच्या " अकलेची गोष्ट" या लोकनाटयाचा विचार करता ग्रामीण जीवनात आढळून येणाऱ्या फसवेगिरी करणाऱ्या लोकांच्या वृत्तीवर प्रकाश टाकला आहे. लोकनाटयातील "गुंडू" आणि " बंडू " यांच्या आजोबापासून फसविण्याची परंपरा चालत आली आहे. तेव्हा " गुंडू " आणि " बंडू " हे सुध्दा फसवेगिरी करणारेच आहेत. पण अण्णाभाऊंनी अशा लोकांच्या फसवेगिरीवर प्रकाश टाकला आहे. व त्यांना जनतेच्या कोर्टात आणून त्यांच्या वृत्तीची जाणीव " जानबा " सारख्या चतुर पात्राच्या माध्यमातून करुन दिली आहे. गुंडू आणि बंडू यांच्या व्यापारी -भांडवलदार आजोबांनी आपल्या कष्टकरी आजोबांची फसवणूक केली. हे सांगत असताना जानबा म्हणतो.

" वोळख तुमच्या माझ्या बापाची ।
तुमच्या बापला गरज धान्याची ।
लागली नऊ लाख खंडीची ।
विनवणी करुन माझ्या बापाची ।
घेऊन गेला पोती गव्हाची ।
याच्या बापाला गरज कडब्याची ।
टंचाई आली वैरणीची ।

उपाशी गुरं मरत होती त्याची ।
पाच हजार गाडी कडब्याची ।
घेऊन गेला दाद नाही त्याची ।
दोघानी बोली केली उधारीची ।
याद बघा तुम्ही विसरला त्याची ।"[१]

असे सांगून " गुंडू" आणि " बंडू " यांच्या फसवेगिरीवर व मीपणावर प्रकाश टाकला आहे. समाजामध्ये फसवेगिरी करणारे अनेक लोक आहेत. ते सामान्य, भोळया-भाबडया शेतक-यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना फसवतात. तेव्हा सामान्य माणूस जागृत होऊन तो शोषणमुक्त झाला पाहिजे. असे अण्णाभाऊंचे स्वप्न होते. हा विचार प्रामुख्यानी या ठिकाणी मांडलेला दिसतो.

" शेटजीचे इलेक्शन " या लोकनाटयामधून ग्रामीण भागात आढळून येणा-या विविध समस्यांचे दर्शन घडविले आहे. " मगरचंद" हा निवडणुकीला उभा राहतो. निवडून आल्यानंतर ग्रामीण भागात अनेक सुधारणा करीन अशी आश्वासने देतो. उदाहरणार्थ.

" सडका नीट करीन गावाच्या । पाय-या घाटाच्या
पूल एक दगडी बांधीन । रस्त्याला रस्ता सांधीन
देवळावर कळस चढवीन । आड काढीन ।
शाळा एक मोठी उघडीन । पोराबाळाना देऊ ज्ञान ।।
धर्मशाळा वाटसरूसाठी । करू खटपटी
दवाखाना आणू एक गावाला । रोग नाही येणार
नावाला ।।"[२]

मगरचंदची ही आश्वासने ऐकून वर्ग जागृत " धोंडया" खुष न होता प्रश्न विचारतो की, हा सावकारी आणि जमीनदार या रोगाचा कसा काय नायनाट करणार ? यावरुन ग्रामीण जीवनांत आढळून येणा-या विविध समस्यांचे प्रभावी दर्शन घडविले आहे.

तसेच " बिलंदर बुडवे " यासारख्या लोकनाटयामधून "बाबुराव बाजी बुडवे" आणि मलकापूरच्या " राणोजी पाटील " यांच्या स्वभावपरिपोषातून ग्रामीण जीवनाचे उत्कृष्ट दर्शन घडविलेले दिसते.

राणोजीच्या रूपाने अण्णाभाऊंनी ग्रामीण भागामध्ये आढळणाऱ्या गुंडगिरीला बळी न पडता त्याला आळा घालण्यासाठी अनेक धाडसी वृत्तीची गावरान माणसे आढळतात. हे सांगत असताना

"राणोजीनं मोठा हिय्या बांधिला ।
बुडव्याला पेचात पकडीला
कर्जात म्हातारा घेतला ।
आणून घरामध्ये ठेविला
मनामध्ये विचार त्यानं केला ।
मरु नाही द्यायचा म्हाता-याला
शेराला सव्वाशेर भेटला ।
राणू पडला इथेला "[3]

याठिकाणी राणोजीच्या रूपाने ग्रामीण जीवनांत जस्यास तसे वागविणारी माणसे जशी दिसतात. तसेच बुडव्यासारख्या अवगुनी लोकांच्यावरही प्रकाश टाकला आहे. छोटे छोटे संवाद, ओघवती शैली, सुलभ कटाव आणि मार्मीक कथावस्तू यामुळे हे लोकनाटय ग्रामीण जीवनांतील सामान्य माणसाच्या वृत्ती-प्रवृत्तींचे मनोज्ञ दर्शन घडविते.

" पुढारी मिळाला " या लोकनाटयामधून ग्रामीण भागामध्येसुध्दा पुढारी होण्यासाठी धडपड करणारी माणसे ही वेगवेगळया वृत्ती-प्रवृत्तीची असतात. याचे दर्शन घडते. " वाघेरी " गावचा " सत्तू" " पडवळ " यांना पुढारी होण्याची दारूण इच्छा आहे. जांभुळवाडीच्या " नारायण मास्तर " याला तरी पुढारी होण्याचे वेड लागले आहे. पण या सर्वांमधून पुढारी म्हणून कोणाला निवडून द्यावयाचे हा प्रश्न गावच्या पाटलाला पडतो तेव्हा.

पाटलानं हिंमत केली । कंबर कसली ।
झाला तय्यार । करोनी निर्धार ।
पुढा-यांची परीक्षा घ्याया । एकी उभाराया "४

अशारीतीने पाटलाने परिक्षा घेऊन योग्य तोच पुढारी निवडायचा. असे ठरवितो. प्रत्येकजण निवडून आल्यानंतर कोणत्या सुधारणा करणार आहोत. याची ग्वाही देऊ लागले. डोईफोडे साहेब म्हणतात..

" तळी विहिरी, कालवे खोदू ।
धरण आम्ही बांधू ।
अडवुनी नद्या उलट वळवू ।।
शिवारात पाणी सा-या खेळवू ।।
लागतील अन्नाच्या राशी । दरवाज्यापाशी
गुरांनी गोठे भरतील । दही दूध पोरं खातील ।। "५

अशी जो तो सुधारणांची अमीशा दाखवून पुढारी होण्याची धडपड करतो. या आश्वासनामधून सुधारणावाचून वंचीत असलेले " वाघेरी " नावड खेड अनेक समस्या घेऊन कसं उभं आहे. याचे जसे दर्शन घडते. तसेच ग्रामीण जीवनांमध्येसुध्दा पुढारी होण्यासाठी लागलेली स्पर्धा लक्षात येते.

" पेंग्याचे लग्न " मधील " पेंग्या" यासारख्या व्यक्तीरेखा-मधून ग्रामीण जीवनामध्ये असणा-या विक्षिप्त स्वरूपाच्या लोकांचे दर्शन घडते. " गावकर" पेंग्याचे लग्न पुतळाशी करून " राणूचा " व कुणबी सेवा संघाचा मान कमी करायचा आणि गावामध्ये असणारे आपले अस्तित्व, मिरासदारी कायम रहावी. यासाठी प्रयत्नशील आहे. " गावकर" गावातील आपलं महत्व सांगताना म्हणतो.

" गावकर - आम्ही गावकरी । मानकरी । गावाचं हीतकरी
आम्हाविणं तुमचं चालल का ?

राणू - म्हातारीन आपलं । कोंबड झाकलं ।
सूर्योदय कधी थांबल का ?

गावकर - आम्ही गावात राहातो । कारभार करतो ।।
लोकांची लग्न का लावतो ? ।।

राणू - झाकून डोळा । नदीला बगळा । टपून सांगा का बसतो ।। .६

वरील गावकर व राणू यांच्या संवादातून अखेर राणूचा म्हणजे कुणबी सेवा संघाचा विजय होतो. सर्व गावकरी मंडळी राणूचेच बरोबर आहे. असा आग्रह धरतात. त्यावेळी गावक-याला माघार घ्यावी लागते. याठिकाणी ग्रामीण जीवनामध्ये आढळून येणारी रूढीप्रियता आणि सर्वसामान्य जनतेच्या सुखदु:खांचा विचार प्रकर्षाने केल्याचे जाणवते.

" खाप-या चोर" या लोकनाटयातील जेजुरी जवळील सनगरवाडीचा " दाजी बाजी " या शेतक-याला " भोलाराम " सावकाराने फसविल्यामुळे तो " खाप-या चोर"या नावाने प्रसिध्दिला येतो. या खाप-या चोराच्या एकूणच वागण्या बोलण्यातून अण्णाभाऊंनी अस्सल गावरान माणसांच्या वृत्ती प्रवृत्तींचे दर्शन घडविले आहे.

या लोकनाटयातील " भोलाराम " सारखे सावकार, जमीनदार हे पिळवणूक करणा-यांचे प्रतिनिधी आहेत. पण आज ग्रामीण जीवनातील शेतकरी, कष्टकरी जागृत झाला आहे. त्याला आपल्या हक्कांची जाणीव झाली आहे. त्यामुळे शेतकरी अनेक युक्त्या करून सावकारची फजिती उडवितो. व आपल्या जमिनी सोडवून घेतो. तसेच " दाजी बाजी" सारख्या व्यक्तिरेखातून ज्यावेळी अन्यायाची परिसिमा होते. त्यावेळी प्रतिक्रिया करण्यासाठी सा-या शक्तीनिशी उठणारी ग्रामीण माणसे अतिशय प्रत्ययकारीपणे अण्णाभाऊंनी प्रस्तुत लोकनाटयामध्ये साकार केलेली दिसतात.

सावकार, जमीनदार यांच्या शोषणातून सर्व सामान्य माणूस, कष्टकरी मुक्त व्हावा. त्याला स्वत:चे स्वतंत्र जीवन स्वाभीमानाने जगता यावे. याची तळमळ अण्णाभाऊंना लागली होती. ही तळमळ प्रस्तुत लोकनाट्यातून यशस्वी झालेली दिसते.

" देशभक्त घोटाळे " यासारख्या लोकनाट्यातील " हैबती पाटील " सारख्या व्यक्तिरेखामधून अस्सल ग्रामीणत्व प्रकट होताना दिसते. " हैबती पाटील " याची मोठी मान, मोठे कपाळ, भरदार गुलछबू मिशा यामधून ग्रामीण जीवनांत आढळून येणाऱ्या लोकांचा वेगळेपणा नजरेत भरतो. कायदेमंडळाचा सभासद " घोटाळे " हा जनसंपर्क वाढविण्यासाठी व पक्ष संघटना करण्यासाठी खेड्यामध्ये जातो. त्यावेळी अनेक सुधारणांची केवळ आश्वासनेच देतो. पण ग्रामीण भागात असणाऱ्या अनेक समस्यांची व ज्वलंत प्रश्नांची त्याला जाणीवही नसते. त्यावेळी तेथील सामान्य जनता " घोटाळे " ना घोटाळून सोडतात. यातूनच " घोटाळे " यांच्या विक्षीप्त वर्तनाचे जसे दर्शन घडते. तसेच ग्रामीण समस्यासंबंधी असणारा त्यांचा कळवळा किती नकली आहे हेही लक्षात येते.

२. राजकीय जीवनाचे चित्रण :

अण्णाभाऊंची राजकीय जीवनाचे चित्रण करणारी अनेक लोकनाट्ये आढळतात. यामधून राजकारण्यांचा भ्रष्ट स्वभाव, पुढारी किंवा नेते मंडळीकडून सर्वसामान्य लोकांची होणारी फसवणूक, सामान्यांविषयी बेजबाबदारपणा, लाचलुचपत इत्यादी बाबींचे दर्शन घडते. स्वातंत्र्यपूर्व व नंतरच्या निवडणुकीतील विविध कडवट अनुभव, मतदानातील घोटाळे, राजकारण्यांचा आपमतलबीपणा व निवडून येण्यासाठी कोणत्याही थराला जाण्याची बेछूट वृत्ती यांचेही मनोज्ञ दर्शन घडविले आहे. त्यादृष्टीने विचार करता त्यांच्या " शेटजीचे इलेक्शन " या लोकनाट्यातील मंत्री मगरचंद हे आपली खूर्ची पक्की राहण्यासाठी कोणत्याही थराला जाण्याची त्यांची वृत्ती दिसते. किसान सभेचा कार्यकर्ता " सत्तू " " मगरचंद" याना म्हणतो.

" सत्तू-नोकरशाहीला । हाकलायला । एकी देशामध्ये कराल का ? ।

मगरचंद - मुसलमानाचा स्वनिर्णयाचा वेडा हट्ट कोण
पुरवील का ? [7]

असे मगरचंद " सत्तू " यास सांगून हे राजकारण शेतक-याना कळायचं नाही अशी आपली हुशारकी मारतो पण " सत्तू " म्हणतो.

" सत्तू- शेतक-यांचा । न्याय्य हक्काचा । कायदा कसाला
लावाल का ? ।।
मगरचंद- पचेल ते खावं । शोभेल ते लयावं । भलतं सलतं
काय मागू नका ।।
सत्तू - पोटाला पोटभर । मिळाया भाकर । जमीन घरोधर
वाटाला का ? ।।

मगरचंद- तुझं हे बोलणं । तिरकस चालणं । सांग कोणाला
पटल का ? ।।
सत्तू - कर्जमाफीचा । ( सावकारांच्या) जमीन जप्तिचा ।
कायदा सक्तिचा आणाल का ।? ।।
मगरचंद- असं कुठं आलं । कुणी पाहिलं । याला पुरावा
देशील का ? ।। [8]

वरील संवादातून " मगरचंद " यांची कुटराजनिती जशी लक्षात येते. तसेच अण्णाभाऊंनी जनसमुहासमोर तत्कालीन काळातील प्रतिगामी पुढा-यांची वृत्तीही दर्शविलेली दिसते. भांडवलशाहीतील " पुढारी" यांच्या ढोंगीपणाच्या बुरख्यावर कोरडे ओढणे हे या लोकनाटयाचे प्रयोजन दिसते.

" पुढारी मिळाला " या लोकनाटयातील " डोईफोडे" साहेब म्हणतो, देशाला स्वातंत्र्य मिळविण्याकरिता आम्ही जीवाचे रान केले. अनेक यातना सोसल्या. ब्रिटीशांविरुध्द अहर्निशी लढा देऊन त्याना पळवू न लावले. याचे महत्व सांगताना " डोईफोडे "

म्हणतो.

" आम्ही बहाद्दर दर्दी । करून गर्दी ।
आम्हीच परका पळवला । तरुण रणावर खेळवला ।
सदा अग्रणी । लढा देऊनी । स्वतंत्र भारत मिळविला ।।"[९]

म्हणजेच देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आमचा वाटा फार मोठा आहे. असे " डोईफोडे " सांगतात. तेव्हा किसान सभेचा कार्यकर्ता " सत्तू " त्याला चोक प्रत्युत्तर करतो.

" तुम्ही बहाद्दर, मग ऐका -
तुम्ही धीरान ऐका । भडकू नका ।
सिंह वनामध्ये पिसाळला । त्याने गजाला लोळवला ।
बहाद्दर कोल्हा होता ओढयाला ।
ताव माराया । चेकाळला "[१०]

वरील " सत्तूच्या प्रत्युत्तरातून " डोईफोडे " साहेबांची जसी नकली देशभक्ती लक्षात येते. तसेच दोघांच्या संवादातून " डोईफोडे"ची मुत्सद्येगिरी नजरेत भरते. वाजवी देशभक्ती घेऊन सुधारणांच्या आहारी गेल्यामुळे " डोईफोडे " ची राजकीय वृत्ती लक्षात येते.

" तसेच " मूक मिरवणूक " लोकनाटयातील संघर्षासाठी प्रत्यक्षात मैदानात न उतरता केवळ तात्वीक बढाया मारणा-या, योग्य की, अयोग्य व जहाल की मवाळ असे प्रश्न उभे करून पलायनवादी भूमिका स्वीकारणा-या श्रीयुत "उपासे " सारख्या समाजवादी पक्षाचे नेतृत्व करणा-या राजकारणी नेत्यांची कमजोर वृत्ती दर्शविलेली दिसते. कोणताही प्रश्न धसास लावून तो सोडविण्यासाठी निकराचा प्रयत्न करणे, संघर्ष करणे, लढा देणे ही कम्युनिस्टांची रीत येथे " विष्णू" सारख्या कामगाराच्या पुढारीपणातून व्यक्त केलेली दिसते.

" लोकमंत्र्याचा दौरा" या लोकनाटयातील मंत्री मगरचंद हे मुंबईतील झोपडपट्टीत आणि चाळीत रहाणा-या लोकांच्यासमोर

भाषण करतात. त्यावेळी सामान्य जनांच्या कोणत्याही समस्यांचा त्यानी विचार केलेला नाही. केवळ झाडे लावा, स्वच्छता ठेवा, कमी अन्न खावा. आणि जास्त काम करा. म्हणजे आपला देश अधिक विकसीत होईल. अशाप्रकारचे उपदेश करतात. यातून त्यांची संधीसाधू वृत्ती लक्षात येते.

तेथील कामगारांचे प्रश्न यामध्ये बेघरांची समस्या, म्हागाई, काळाबाजर, भ्रष्टाचार, लाचलुचपत, बेकारी, उपासमार, आरोग्या-विषयी दुरावस्था यासंबंधी काहीही सुधारणा न करता केवळ "सत्यमेव जयते" " शांतता पाळा" दारूबंधी लक्षात घ्या" " जयहिंद" अशा प्रकारचे मंत्री महाशय फक्त उपदेशच करतात. परंतु यामधील एकही सुधारणा त्यानी कधीही कृतीमध्ये आणलेली नाही. यामधून अण्णा-भाऊंनी तत्कालीन मंत्री मंडळाच्या कार्यपध्दतीवर प्रकाश टाकलेला दिसतो. मंत्री जनतेला उपदेश करतात.

मंत्री - आम्ही देशांत झाडं । लावू चहुकडं ।
सुखी कराया जनतेला ।।

विष्णू - तुम्ही होऊन भामटे । घेता चिमटे ।
पुरं समजलं लोकांला ।। ७ ।। ""

" विष्णू " च्या या प्रतिक्रियेतून मंत्री मगरचंद याना जनप्रश्नांचे वास्तव भान नाही. भोंगळ संधीसाधू अशा राजनितीमुळे आणि जनतेच्या वर्तमान जीवनाशी कार्यकर्त्यांचा संपर्क न आल्यामुळे मंत्री मगरचंद केवळ वारेमाप बोलतातच व जनतेशी बेइमानाने वागतात. याचे दर्शन घडते.

" देशभक्त घोटाळे " या लोकनाटयातील कायदेमंडळाचे सभासद " घोटाळे " हे कॉंग्रेसचे आहेत. आपल्याला पुन्हा निवडून यावं. यासाठी खेडेगावामध्ये घरोघरी जाऊन रामराम करतात. पण कर्तव्यदक्ष नसलेल्या घोटाळेना सामान्य जनता घोटाळून सोडते. याठिकाणी भांडवलशाही" तील पुढारी व मंत्री यांच्या ढोंगीपणाचे बुरखे जनतेसमोर उघडे करुन दाखविले आहेत.

" निवडणुकीत घोटाळे " या लोकनाटयामध्ये सुध्दा राजकारण्यांच्या दांभिकपणावर प्रकाश टाकलेला दिसतो. " घोटाळे " नावाचा कॉंग्रेसचा नेता निवडणुकीसाठी उभा राहतो. व मतदारांच्या मागे मते मिळविण्यासाठी गबाळ्यासारखे वागतो. तसेच महात्मा गांधींच्या विचारातील तात्विक भूमिका जनतेला पटवून सांगून आपण गांधीवादी आहोत असे सांगतात. यामधून कॉंग्रेसची राजनिती उघडी पाडलेली दिसते.

" बेकायदेशीर " या लोकनाटयातील " मगरचंद " हे निवडणुकीला उभे रहातात. मते मिळविण्यासाठी कामगाराना हाताशी धरतात. व आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी दिल्लीला जाऊ अशी आश्वासने देतात. पण प्रत्यक्षात ज्यावेळी " मगरचंद" निवडून येऊन मंत्री होतात. त्यावेळी कामगारांच्या मागण्यांशी बेफिकीर होतात. तेव्हा कामगार नेता " सत्तू " विचारतो.

सत्तू - " चलो दिल्लीला । घोष केलेला । आता कसा तो विसरता ?

मगरचंद- ताब्यात दिल्ली । आमुच्याच आली । तिकडे जाण्याची
नको चिंता ।।६।।

सत्तू - तुम्ही शेतकरी -कामकरी । जनतेचे कैवारी
संपाला विरोध का करता ? ।

मगरचंद- पाण्यात राहूनी माशाशी दुष्मनी ।
पदरी बांधुनी का घेता ? ।।८।। [१२]

अशा खटकेबाज संवादामुळे दोघांच्या भूमिकेतील फरक स्पष्ट करुन राजकारणी लोकांच्या ढोंगीपणावर व स्वार्थीवृत्तीवर प्रकाश टाकलेला दिसतो.

३. विषमतेचे चित्रण :

अण्णाभाऊ हे वर्गीय जाणीव जाणणारे होते. त्यामुळे त्यांची बरीचशी लोकनाटये ही वर्गीय जाणीवेतून निर्माण झालेली आहेत. यातूनच गरीब आणि श्रीमंत यांच्यातील विषमतेचे चीत्र प्रकट होताना दिसते. गरीबांच्याविषयी जिव्हाळा, ओढ, तळमळ आणि धनदांडग्याकडून सर्वसामान्य जनांची होणारी पिळवणूक याची मनस्वी चीड अण्णाभाऊंना होती. ग्रामीण जमीनदार, शेठ सावकार आणि भांडवलदार हे कष्टक-यांचे शोषक आहेत. त्याचा शोषक वृत्ती बळावलेली आहे. ती शोषक वृत्ती नष्ट करुन सर्वसामान्याला शोषण-मुक्त करणे. या उर्मीतून अण्णाभाऊंनी अनेक लोकनाटये निर्माण केलेली दिसतात. त्यादृष्टीने विचार करता " अकलेची गोष्ट " या लोकनाटया-मध्ये " जानबा " हा शेतक-यांचा प्रतिनिधी आहे. तसेच तो किसान-सभेचा कार्यकर्ता आहे. पण गावातील सावकार आणि गवळी हे शेत-क-यांची अमानुष पिळवणुक करुन स्वत:ची तुंबडी भरतात. पण शोषीत सामान्य वर्ग गरीबीमुळे हैराण होऊन सावकार व गवळी यांच्याकडून होणा-या अन्यायाचा सुड घेतात. वर्गीय जाणीव असलेला " जानबा" कष्टकरी शेतक-यांची बाजू समर्थपणे मांडण्यास यशस्वी होतो. तसेच सावकार व गवळी यांच्या खोटारडया व्यापारी, भांडवलदार आजोबांनी आपल्या कष्टकरी आजोबांची फसवणूक केली. तेव्हा सावकार व गवळी याना जानबा सुनावतो.

" लाज धरुन पूर्वजांची । भागवून टाका रक्कम आमुची...
धडगत नाही आता तुमची । विचार करा मनि ।। "[१३]

याठिकाणी गवळी आणि "सावकार " यांचा खोटारडेपणा, श्रीमं-तीचा अहंभाव आणि कष्टक-यांची फसवणूक करण्याची वृत्ती, यामुळे हैराण झालेली सामान्य जनता याचे उत्कृष्ट दर्शन घडविले आहे.

तसेच " पेंग्याचे लग्न " या लोकनाटयातील "गावकर" याचा गावावरती दरारा आहे. हा दरारा असाच कायम रहावा. यासाठी तो प्रयत्नशील आहे. " गावकर " हा सनातनी विचराने ग्रासल्यामुळे सामान्य जनतेवरती अन्यायाची परिसिमा होते. त्यामुळे सामान्य जनता गावकरांविरूध्द बंड पुकारते. पण गावकरकीचा हक्क हा आम्हाला पूर्वीपासून चालत आला आहे. आणि तो मान आम्हालाच कायम मिळाला पाहिजे. अशी गावकरयांची इच्छा आहे. पण कुणबी सेवा संघाचा कार्यकर्ता " राणू " या गोष्टीना साफ नकार देतो. त्यामुळे गावक यांची त्रेधा उडते. " राणू " म्हणतो.

" झाकून डोळा । नदीला बगळा । टपून सांगा का बसतो ।। [१४]

यावरून गावकर यांची कपटी वृत्ती नजरेत येते. याठिकाणी सरंजामदार व सामान्य जनता यांच्यातील फरक स्पष्ट करून सरंजाम/शाही प्रवृत्ती विरूध्द सामान्य जनतेने पुकारलेले बंड हे कसे यशस्वी झाले आहे. हा विचार मांडलेला दिसतो.

" लोकमंत्र्याचा दौरा" या लोकनाटयातील एका बाजूला मंत्री मगरचंद यांचे अन्यायी वक्तव्य तर दुस-या बाजूला मुंबईतील झोपडपट्टीत रहाणारी व दारिद्र्यामुळे हैराण झालेली सामान्य जनता यांच्या वर्णनातून सामान्य जनतेविषयीच्या मंत्र्याचा कळवळा किती कृत्रीम आहे. हे स्पष्ट होते. मंत्री केवळ वारेमाप बोलतातच पण झोपडपट्टीतील असणा-या समस्या सोडविण्याचा विचार त्यांनी कधीही केलेला नाही. झाडे लावा, स्वच्छता ठेवा, कमी अन्न खावा, आणि जास्त काम करा. म्हणजे आपला देश अधिक समृध्द होईल अशाप्रकारचे केवळ उपदेशच करतात. पण तेथील बकालवस्तीची समस्या, महागाई, दैन्य, दारिद्र्य, भ्रष्टाचार, लाचलुचपत, उपासमार, बेकारी यामुळे कामगारांची दुरावस्था आली आहे. यासंबंधी

काहीही सुधारणा न करता केवळ सत्यमेव जयते" " शांतता पाळा" " दारूबंधी लक्षात घ्या" " जयहिंद " अशाप्रकारच्या घोषणाच करतात. यातून अण्णाभाऊंनी तत्कालीन मंत्रीमंडळाची कार्यपध्दती, यामुळे सामान्य माणसाची झालेली दैण्यावस्था किती भयावह आहे. याचे उत्कृष्ट दर्शन घडविलेले दिसते.

" खाप-या चोर " या लोकनाटयातील " भोलाराम सावकर" " दाजी बाजी " या शेतक-यावरती अन्याय करून त्यास देशोधडीला लावतो. परिस्थितीमुळे हिकमती झाल्यामुळे " दाजी बाजी "हा शेतकरी " खाप-या चोर " या नावाने प्रसिध्दिला येतो. याठिकाणी भोलाराम-सारखे ग्रामीण जमीनदार व शेठसावकार हे ग्रामीण जीवनांतील अज्ञ लोकांचा फायदा घेऊन त्यांची फसवणूक करतात. त्यामुळे ते अण्णाभाऊंच्या प्रक्षोबाचे विषय बनलेले दिसतात.

वर्गजागृत आणि असंतोषाने भडकलेला कष्टकरी " खाप-या चोर" आपल्यावरील अन्यायाला तोंड देण्यासाठी सावकाराला अद्दल घडवितो व आपल्या जमिनी सोडवून घेतो. याठिकाणी पिळवणुकीमुळे हैराण झालेली " दाजी बाजी" सारखी गरीब जनता दिवसभर काबाडकष्ट करून आपला चरितार्थ चालविते. तर दुसरीकडे याच कष्टावरती कुबीर झालेली सावकार, जमीनदार ही जमात किती अमानुष वृत्तीची आहे. याचे प्रत्यय-कारी दर्शन अण्णाभाऊंनी प्रस्तुत लोकनाटयातून घडविलेले दिसते.

४. भ्रष्ट जीवन व्यवहार व दारिद्रयाचे चित्रण :

सर्वसामान्य जनतेचे जीवन सुखी आणि समृध्द व्हावे. याची आस अण्णाभाऊंना लागली होती. पण तत्कालीन व्यवस्थेतील राजकीय नेते-मंडळीकडून व शेठ सावकाराकडून ग्रामीण माणूस व मुंबईतील गिरणी कामगार फसला जात होता. गुलामगिरीच्या जात्याखाली भरडला जात होता. सहाजिकच दारिद्रय हे त्याच्या पाचवीलाच पुजले होते. अशा

समाजातील शोषणाच्या सामाजिक, आर्थिक, प्रेरणा नष्ट केल्याशिवाय या मानवसमुहाची प्रगतीच होऊ शकणार नाही. अशी अण्णाभाऊंची धारणा होती. ती त्यांच्या अनेक लोकनाटयातून साकार होताना दिसते. त्यादृष्टीने विचार करता " अकलेची गोष्ट " या लोकनाटयातील गुंडू, बंडू यांच्या आजोबापासून ते गुंडूबंडूपर्यंत यांची सर्व वंशपरंपरा ही भ्रष्ट जीवन व्यवहाराने ग्रासलेली आहे. गरीबाना कर्ज द्यायची व खोटे नाटे कागद करून शेतक-याना लुबाडायचे. तसेच वारेमाप व्याजासह पैसा वसूल करायचा, देवाच्या नांवावर शेतक-यांना फसवायचे असा रयतेवर अन्याय करून पैसा मिळविलेला आहे. पण किसान सभेचा कार्यकर्ता " सत्तू " याला हया गोष्टी मान्य होत नाहीत. तो गुंडू व बंडू याना योग्य धडा शिकवून आपल्यावरील अन्यायाचा सूड घेतो. याठिकाणी भ्रष्ट व्यवहाराविरोधी पुकारलेले बंड कसे यशस्वी झाले आहे. याचा प्रकर्षाने विचार अण्णाभाऊंनी केलेला दिसतो.

" दुकाळात तेरावा " या लोकनाटयातील " झेंडबा" हा तमाशा फडाचा मालक आहे. जयाप्पा, वामनराव, जिजाबा, गणू, तायाप्पा, सदू पुतळा, आणि सरु हे तमाशातील इतर कलावंत आहेत. खेडयापाडयातील जत्रा सुरु होणार आहेत आणि तमाशा फडाचा मालक " झेंडबा" अनेक गावच्या सुपा-या घेऊन तयार आहे. तमाशासाठी " दुकाळात तेरावा " हा नवीन वग बसवायचा आहे. ही माहिती इतर कलावंताना देण्यासाठी " झेंडबा " प्रत्येकाच्या घरी जातो. प्रत्येक ठिकाणी झेंडबाचे अस्ताव्यस्त खाणे, पिणे, वागणे, यामुळे इतर गरीब कलावंतांची तारंबळ उडते. दुष्काळ पडल्यामुळे दारिद्रयाने पिछाडलेले सर्व कलावंत एक एक दिवस कसा पुढे जाईल याची चिंता करीत आहेत अशा अवस्थेत

" दुष्काळातला महिना तेरावा खिशात घेऊन ।
फडाचा मालक बाहेर पडला मोठया दिमाखानं ।।

अन्नटंचाई अन् महागाई दोन संकटात ।
पिडली होती जनता याचं त्याला नव्हतं भानं । "[१५]

झेंडबा अशारितीने प्रत्येकाच्या घरी जाऊन मेजवानी करतो. " झेंडबा" च्या या अस्ताव्यस्त खाण्यापिण्याचे वर्णन करताना अण्णाभाऊ लिहितात - " आता प्रथम चहा येऊ द्या. नंतर अंड्याचा झकपैकी रस्सा करा. कारण आताच जयाप्पाकडं कोंबड्याचं जेवण झालं आहे परंतु उद्या सकाळी चहा झाला की कोंबडी, भात, चपाती, लिंबू, कांदा असा स्वयंपाक होऊ द्या आणि उद्या संध्याकाळी मटणाची तयारी करा. "[१६] " झेंडबा" च्या या वागण्यामुळे सर्व कलावंत त्रासून गेले आहेत. प्रत्येकाच्या घरी गेल्यानंतर झेंडबाला अशी मेजवाणी करावीच लागते. याठिकाणी अण्णाभाऊंनी तत्कालीन परिस्थितीचे भान लक्षात घेऊनच दुष्काळात तेरावा ठरलेला " झेंडबा" किती भ्रष्ट आहे. याचे जसे दर्शन घडविलेले दिसते. तसेच इतर तमासगीर कलावंताचे दैन्य, दारिद्र्य लोकांच्या समोर अविष्कृत केलेले दिसते.

" माझी मुंबई " या लोकनाट्यामध्ये मुंबईतील कामगारांच्या दारिद्र्याचे, त्यांच्या बकाल वस्तीचे केलेले चित्रण थेट हृदयाला जाऊन भिडणारे आहे. लोकनाट्यातील " विष्णू" च्या रूपाने संपूर्ण सामान्य मराठी कामगार चित्रीत केलेला दिसतो. या मराठी कामगाराच्या दैन्यावस्थेचे वर्णन करताना अण्णाभाऊ लिहितात.

" परि समय आला हा खोटा ।
डोकीला नाही पागोटा ।
जोंधळा नाही गहू, खातो रबरी आटा ।।
गिरणीत लावितो तार चालवितो धोटा ।
बंदरात हमाली करतो लावूनी काटा ।

रस्त्याला झोपतो कुठं टाकाच्या खाटा ।
धनफेबाज करति बघा थट्टा । निट चल म्हणती एक बेटा
घडी घडी नडवुनी पुरा पाडिती पिटा ।। "[१७]

वरील लावणी पाहिल्यानंतर सर्वसामान्य जनतेची झालेली दैना, पोट भरण्यासाठी दिवसभर काबाडकष्ट करुन जीवाचा होणारा आटापिटा आणि शेवटी रात्री विसाव्यासाठी योग्य निवारा-सुध्दा मिळत नाही. हे पाहिल्यानंतर मुंबईतील सामान्य माणसाच्या जीवनाची होणारी परवड लक्षात येते.

" बेकायदेशीर " या लोकनाटयातील आपले वर्गीय हितसंबंध सांभाळणारे मंत्री " मगरचंद" " रघुनाथमल " या मिलमालकाच्या मिलमधील कामगारांचा संप बेकायदेशीर ठरवितात. तेव्हा या कामगारांच्या मागण्यांची चौकशी व्हावी. यासाठी सरकारने लवाद नेमला आहे. हा लवाद सुध्दा किती भ्रष्ट आहे. याचे वर्णन करण्यासाठी लिहिलेली टिकात्म लावणी सहज सुंदर वाटते.

" मालकाच्या मतानं आणि सरकारच्या सुतानं
निवड होते लवादाची ।
लवाद म्हणजे माणूस पर जात निराळी असते त्याची ।
मोठा पगार, मोठा दर्जा, मोठ्या इभ्रतिची ।
सात पिढीला, त्याच्या ओळख नसे गिरणी कामाची ।
.......
लवाद म्हणजे उंट, दिसण्यात उंच दिसायचा ।
वर्षाला एक पाऊल या हिशोबान चालायचा ।
तोलून बोल मालकाच्या बाजून बोलायचा ।
.......
टाकून मालक नेईल तिकडं तडक जायचा ।
.......
न्याय म्हणजे ओठ त्याचा लोंबत -हायचा ।

त्यात पराजय हुकमी कामगारवर्गाचा ।
हा न्याय नव्हे अन्याय, अपमान कामगारवर्गाचा । "[१८]

लवादाच्या या वर्णनातून तत्कालीन परिस्थितील कामगारांच्या बाबतीतील न्यायदान व्यवस्था लक्षात येते.

५. प्रादेशिक अस्मितेचे चित्रण :

अण्णाभाऊंनी इतर लोकनाटयाप्रमाणे प्रादेशिक अस्मिता दर्शविणारी काही लोकनाटये लिहिलेली दिसतात. यामध्ये मराठ- मोळ्या माणसाचे येथील प्रदेशाशी असणारे नाते किती एकरूप आणि जिव्हाळ्याचे आहे. याचा विचार केलेला दिसतो.

" माझी मुंबई" या लोकनाटयाचा विचार करता यामधून मराठी माणसाची प्रादेशिक अस्मिता प्रकर्षाने व्यक्त झालेली दिसते. गुजराथ मधील " बनिया" लोक हे व्यापार करण्याच्या हेतूने मुंबईमध्ये आले. त्यानी आपला व्यापार वाढविला. व मुंबई हे कार्यक्षेत्र मानले. पण काही कालानंतर हे लोक मुंबईला आम्ही वाढविले, तिला आम्हीच मोठी केली. तेव्हा ती स्वतंत्र झालीच पाहिजे. म्हणजे तिचा गुजराथ- मध्ये समावेश व्हावा. असा बनिया लोकांचा प्रयत्न होता. पण मुंबई ही मुळातच महाराष्ट्राची आहे. तेव्हा ती स्वतंत्र होणार कशी ? यावर आधारित तत्कालीन काळात संयुक्त महाराष्ट्र चळवळीची बीजे रूजली गेली. व मुंबई ही कुणा एका स्वतंत्र व्यक्तिची वा गटाची नसून ती अखील महाराष्ट्राची आहे हा विचार पुढे आला.

पण भाषावार प्रांतरचनेच्या प्रक्रियेत मुंबई महाराष्ट्राला द्यावी, गुजराथला द्यावी की स्वतंत्र ठेवावी. याविषयावर चर्चा सुरु झाली. शेवटी मुंबई, बेळगांव, कारवार, निपाणी, डांग, उंबरगावसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे. अशी घोषणा घेऊन मराठी माणूस संयुक्त महाराष्ट्र चळवळीत उतरला. पण्णीकर, कंझरू, समितीचा अहवाल समोर आला. व मुंबई महाराष्ट्राला मिळणे कठीन होऊ लागले.

अशा धामधुमीच्या काळात मुंबई ही महाराष्ट्राचीच कशी आहे. हे अतिशय प्रत्ययकारीपणे जनमानसाच्या मनावर रुजविण्यासाठी अण्णाभाऊंनी प्रस्तुत लोकनाट्याची निर्मिती केलेली दिसते. या लोकनाट्यातील " विष्णू " आणि " मुनिमजी " यांच्या संवादातून मुंबई ही महाराष्ट्राचीच कशी आहे. हे अण्णाभाऊंनी तत्कालीन जनमाणसाला पटवून दिले आहे. मुनिमजी म्हणतो .

मुनिमजी : " नाना भाषेची । अनंत जातीची ।
तूच मागशी कशी हिला ? ।।

विष्णू : जशी गरुडाला पंखं । आणि वाघाला नखं ।
तशी ही मराठी मुलखाला... ।। २ ।।

मुनिमजी: आम्ही येऊन मुंबईला । व्यापार वाढवला ।
पैसा पेरिला का बोला ? ।।

विष्णू : नदीला बगळा । जमून सगळा ।
टपून बसतो कशाला ? ।। ३ ।। [१९]

वरील विवेचनावरून मुंबई स्वतंत्र झाली पाहिजे. असे म्हणत असताना मुनिमजीचे कुटील कसब प्रकट होताना दिसते.

पण संयुक्त महाराष्ट्र परिषदेत मुंबई ही अखिल महाराष्ट्राचीच आहे. असे संबोधून " मुनीमजी " आणि " लाडोबा" यांचा निषेद केला जातो. तेव्हा " मुनिमजी " म्हणतो -

" तोंड पैशाचं सोडलं । कारखानं काढलं ।
वैभवशाली केली हिला ।।

यावर विष्णू उत्तर देतो, आकाश माझं । धरणी माझी ।
कशी द्यावी ही उपऱ्याला ? ।। ४ ।। [२०]

वरील विवेचनावरून अखील महाराष्ट्रातील मराठी जनतेचा मुंबईशी असणारा अतूट संबंध स्पष्ट होतो. यातूनच अण्णाभाऊंनी मराठी माणसाची प्रादेशिक अस्मिता निखळ शब्दात आविष्कृत केलेली दिसते.

" देशभक्त घोटाळे " या लोकनाट्यातील " घोटाळे" यांच्या भ्रष्ट कार्यपध्दतीला विरोध करताना सामान्य जनता म्हणते.

" कुरुक्षेत्र मुंबईला। तुम्ही रण तळ दिला ।
कर्ण द्रोण भीष्मापरी आला ।
म-हाठयांशी जंग करण्याला ।
घेऊन मोठा दळभार। केला तुमही भडीमार
धूर विषारी चौफेर पेरला। अजून नाही"..... [२१]

आणि तुम्ही धनीकांच्या आश्रयाला जाऊन आपली कुवत सुधारुन घेतला. आणि आम्हला दिलेल्या वचनाला म्हणजे " गरीबी हटाव" या ब्रीदाला तुम्ही दगा दिला. श्रीमंत लोकांची, निदंक लोकांची साथ घेऊन तुम्ही आमचा घात केला. पण आम्ही त्याला डरत नाही. भीत नाही. आणि मागेही सरणार नाही. शेवटी विजय हा आमचाच आहे. कारण आम्ही आता एकजूटीच्या रथावरती आरूढ झालो आहोत. याठिकाणी अण्णाभाऊंनी सामाजिक विषमतेच्या चित्रणाबरोबर म-हाठी माणसाची प्रादेशिक अस्मिता प्रकर्षाने व्यक्त केलेली दिसते.

सारांश :

अण्णाभाऊंच्या या एकूणच लोकनाट्यांचा विचार करता आपल्या साहित्यजीवनांत त्यानी ही वेगळया विषयाची आणि आशयाची लोकनाट्ये लिहिली. व मराठी मनाचे रंजन करून प्रबोधनाचे महान कार्य केलेले दिसते. ही सर्व लोकनाट्ये साधारणपणे १९४५ ते १९६९ च्या दरम्यान लिहिली. व मराठी साहित्यात लोकनाट्याचे नवे पर्व सुरु केले.

अण्णाभाऊंनी आपली ही लोकनाटये शाहीर अमरशेख व शाहीर द. ना. गव्हाणकर यांच्या सहाय्याने लालबावटा कलापथकाच्या द्वारे अतिदूर खेडयातील गांजलेल्या शेतक-यापर्यंत नेऊन पोहोचविली. व त्यांना संघर्षाची जाणीव करुन दिली. त्यामुळेच अण्णाभाऊंची वरील सर्वच लोकनाटये ही समकालीन जीवनांती समरस होऊन आविष्कृत झालेली दिसतात.

अण्णाभाऊंनी आपल्या साहित्य जीवनांत लिहिलेली ही लोकनाटये अतिशय अव्वल दर्जाची आहेत. " अकलेची गोष्ट" या लोकनाटयामधून अण्णाभाऊंनी शेतकरी वर्गाला आपल्या हक्काविषयी जागृत राहण्याचा संदेश दिला आहे. " देशभक्त घोटाळे" आणि " शेटजीचे इलेक्शन " ही दोन्ही लोकनाटये कम्युनिस्ट पार्टीच्या प्रसारासाठी लिहिलेली लोकनाटये आहेत. यामध्ये देशभक्त घोटाळे हा कॉंग्रेसचा उमेदवार याच्या भ्रष्ट कार्यपध्दतीमुळे त्याची फजिती होते. व कम्युनिस्ट पार्टीचा उमेदवार त्याच्या कर्तव्यदक्ष निस्वार्थी कार्यपध्दतीमुळे लोकप्रिय ठरतो. "शेटजीचे इलेक्शन " हे लोकनाटय निवडणुकीत कष्टकरी शेतकरी, कामगार वर्गाचे राजकारण निर्धाराने पुढे नेण्यासाठी प्रेरणा देणारे आहे. " निवडणुकीत घोटाळे" " पुढारी मिळाला" ही लोकनाटये याच उद्देशाने लिहिलेली दिसतात. भांडवलशाहीतील पुढारी व मंत्री लोकांच्या ढोंगीपणाचा बुरखा फाडण्यासाठी " देशभक्त घोटाळे "व " लोकमंत्र्याचा दौरा" ही लोकनाटये लिहिली " लोकमंत्र्याचा दौरा " व"मूक मिरवणूक" ही लोकनाटये कॉंग्रेस व कम्युनिस्टांच्या ध्येयधोरणातील फरक सांगण्यासाठी लिहिलेली दिसतात. यामधून कामगारांची एकजूट सत्याचा विजय व लबाड संस्कृतीवरील भाष्य चित्रित केलेले आहे. " लोकमंत्र्याचा दौरा" यामध्येही अण्णाभाऊंनी मगरचंद मंत्र्याच्या तोंडी केवळ उपदेशाचेच अनेक घोट जनतेला पाजलेले दिसतात. पण ते कसे निरर्थक आहेत. हे अतिशय मार्मिक शब्दात अण्णाभाऊंनी सांगितले आहे.

" मूक मिरवणूक " या लोकनाटयामध्येही कम्युनिस्ट पक्ष हा सर्वसामान्य कामगार जनतेचा पक्ष सत्तेपासून दूर राहिला. याची नकळत खंत अण्णाभाऊंना लागली होती. याची जाणीव प्रस्तुत लोकनाटयामधून अविष्कृत होताना दिसते.

" पेंग्याचे लग्न" यासारख्या लोकनाटयातून ग्रामीण जीवनांत असणारी साधी भोळी माणसं आणि त्याचा पुढारी लोकानी घेतलेला फायदा हे सांगून यावर मात करण्यासाठी " कुणबी सेवा संघा"ची तत्व राणूच्या रुपाने मांडलेली दिसतात. " खाप-या चोर" या लोकनाटयामधून सुध्दा अन्यायावर मात करण्यासाठी जीवाची परवा न करणारी आडदांड माणसं दाजी बाजी च्या माध्यमातून चितारलेली दिसतात. संयुक्त महाराष्ट्र चळवळीला गती देण्यासाठी लिहिलेले " माझी मुंबई " लोकनाटय केवळ मुंबई ही अखील महाराष्ट्राची आहे. एवढेच सांगीतलेले नाही, तर महाराष्ट्रीयन माणसांची प्रादेशिक अस्मिता जागविण्याच्या दृष्टीने प्रस्तुत लोकनाटय उल्लेखनिय आहे. अण्णाभाऊंचा ध्यासंग आणि युक्तिवाद यांचा मनोज्ञ मिलाफ प्रस्तुत लोकनाटयामधून साकार झालेला दिसतो. त्यामुळे ग्रामीण ढंगाचे हे लोकनाटय अण्णाभाऊंच्या शाहिरी प्रतिभेचे रम्य दर्शन घडविते.

तसेच " बेकायदेशीर" " खाप-या चोर" " पेंग्याचे लग्न " " दुकाळात तेरावा" यासारख्या लोकनाटयातून मोठया कलात्मकरित्या व प्रभावीरित्या वर्गसंघर्षाचा आणि नव्या प्रागतिक विचारांचा प्रसार करुन वर्गजागृती घडविण्याचे महत्वपूर्ण कार्य केलेले आढळते. या वरील सर्वच लोकनाटयांचा विषय हा तात्कालिक व पक्षीय प्रसाराचा असल्यामुळे त्याना आज फारसे महत्व राहिलेले दिसत नाही. मात्र एक निश्चित आहे की एखादा विषय रुक्ष असला तरी त्याला रंजक करुन सादर केल्यामुळे रसिक मनाची पकड घेणारा ठरतो. याची प्रचीती अण्णाभाऊंच्या या सर्वच लोकनाटयातून येते.

एकूणच अण्णाभाऊंच्या या सर्वच लोकनाट्यांचा विचार करता त्यांच्या लोकनाट्यातील निखळ विनोद, खटकेबाज संवाद, आणि प्रखर सामाजिक आशय घेऊन सजलेले कथानक अविस्मरणीय असेच आहे. त्यादृष्टीने " खाप-या चोर" " बिलंदर बुडवे " " पेंग्याचे लग्न " आणि " अकलेची गोष्ट" ही लोकनाट्ये आजही प्रयोगक्षम आणि लोकप्रिय ठरतील. यात शंका नाही.

संदर्भ टीपा

१. साठे, अण्णाभाऊ — नवे तमाशे, चंद्रकांत शेटये प्रकाशन, कोल्हापूर, १९८०, आवृत्ती दुसरी, पृष्ठ- १८, १९.

२. तत्रैव, — पृ. ३३.

३. भोसले, सं. सा. (संपा.) — अण्णाभाऊ साठे : अप्रकाशित वगनाट्ये, लेखन वाचन प्रकाशन, औरंगाबाद, कोल्हापूर, १९९२, पृ. ८५-८६.

४. तत्रैव, — पृष्ठ - ५८.

५. तत्रैव, — पृष्ठ - ७१.

६. तत्रैव, — पृष्ठ- १६.

७. साठे, अण्णाभाऊ — नवे तमाशे, चंद्रकांत शेटये प्रकाशन, कोल्हापूर, १९८०, आवृत्ती दुसरी, पृष्ठ - ३४.

८. तत्रैव, — पृष्ठ- ३५.

९. भोसले, सं. सा. (संपा.) — अण्णाभाऊ साठे : अप्रकाशित वगनाट्ये, लेखन, वाचन प्रकाशन, औरंगाबाद, कोल्हापूर, १९९२, पृष्ठ-७३.

१०. तत्रैव, — पृष्ठ- ७३.

११. साठे, अण्णाभाऊ — नवे तमाशे, चंद्रकांत शेटये प्रकाशन, औरंगाबाद, कोल्हापूर, १९८०, आवृत्ती दुसरी, पृ. १२८.

१२. तत्रैव, पृष्ठ- ५३.

१३. तत्रैव, पृष्ठ- १९.

१४. भोसले, सं. सा. (संपा.) अण्णाभाऊ साठे: अप्रकाशित वगनाट्ये, लेखन वाचन प्रकाशन, औरंगाबाद, कोल्हापूर, १९९२, पृष्ठ. १६.

१५. तत्रैव, पृष्ठ- २५.

१६. तत्रैव, पृष्ठ-३३.

१७. साठे, अण्णाभाऊ नवे तमाशे, चंद्रकांत शेटये प्रकाशन, कोल्हापूर, १९८०, आवृत्ती दुसरी, पृष्ठ- ५७.

१८. तत्रैव, पृष्ठ ४४.

१९. तत्रैव, पृष्ठ -७०.

२०. तत्रैव, पृष्ठ- ७१.

२१. साठे, अण्णाभाऊ देशभक्त घोटाळे, विद्यार्थी प्रकाशन, पुणे, १९८७, आवृत्ती दुसरी, पृष्ठ- ४२.